जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयातील गट ब -अराजपत्रित (कनिष्ठ अभियंता वगळून) आणि गट क मधील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी नागरी सेवा मंडळांची स्थापना करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण १११४/ प्र. क्र. १५४/ आस्था (अतांत्रिक)

१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक: ४ फेब्रुवारी, २०१६.

<u>वाचा -</u>

1. **शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही २०१४/ प्र. क्र. २६ / १२, दिनांक ३१ जानेवारी, २०१४.**
2. **शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही २०१४/ प्र. क्र. २६/ १२ दिनांक १९ जानेवारी, २०१५.**
3. **शासन निर्णय क्रमांकः जलसंपदा विभाग, क्र. सुमात २०१२/ प्र. क्र. ३०६/ २०१२/ आस्था अतांत्रिक, दिनांक २१ मार्च, २०१३.**
4. **शासन निर्णय क्रमांकः जलसंपदा विभाग, क्र. बदली १७१४/ प्र. क्र. ६०४/ १४/ आस्था (अतांत्रिक), दिनांक ३० जून, २०१५.**

शासन परिपत्रक-

मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन (सिव्हील) क्र. ८२/ २०११ मध्ये दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ रोजी दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन शासन निर्णयांन्वये निर्देश दिल्यानुसार जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील सात परिमंडळांतील गट ब - अराजपत्रित (कनिष्ठ अभियंता वगळून) आणि गट क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या परिमंडळाबाहेरील आणि परिमंडळांतर्गत पदस्थापना व बदल्या याविषयी शिफारस करण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे अधीक्षक अभियंता यांचे अध्यक्षतेखाली परिमंडळनिहाय नागरी सेवा मंडळ (२) स्थापन करण्यात येत आहे:-

	पुणे परिमंडळ	
१	अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे.	अध्यक्ष.
२	कार्यकारी अभियंता, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे.	सदस्य.
३	सहाय्यक अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे.	सदस्य.
४	पुणे परिमंडळातील अधीक्षक (नसल्यास प्रथम लिपिक).	सदस्य सचिव.
	नागपूर परिमंडळ	
१	अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपूर.	अध्यक्ष.
२	कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, अजनी, नागपूर.	सदस्य.
३	सहाय्यक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपूर.	सदस्य.
४	नागपूर परिमंडळातील अधीक्षक (नसल्यास प्रथम लिपिक).	सदस्य सचिव.
	औरंगाबाद परिमंडळ	
१	अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद.	अध्यक्ष.
२	कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र. १, पैठण.	सदस्य.
३	सहाय्यक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद.	सदस्य.
४	औरंगाबाद परिमंडळातील अधीक्षक (नसल्यास प्रथम लिपिक).	सदस्य सचिव.
	अमरावती परिमंडळ	
१	अधीक्षक अभियंता व प्रशासक, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती.	अध्यक्ष.
२	कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा धरण विभाग, अमरावती.	सदस्य.
३	सहाय्यक अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती.	सदस्य.
४	अमरावती परिमंडळातील अधीक्षक (नसल्यास प्रथम लिपिक).	सदस्य सचिव.
	नाशिक परिमंडळ	
१	अधीक्षक अभियंता, मेरी, नाशिक.	अध्यक्ष.
२	कार्यकारी अभियंता, परिक्षण व दुरुस्ती विभाग, मेरी, नाशिक.	सदस्य.
३	सहाय्यक अधीक्षक अभियंता, मेरी, नाशिक.	सदस्य.
४	नाशिक परिमंडळातील अधीक्षक (नसल्यास प्रथम लिपिक).	सदस्य सचिव.
	मुंबई परिमंडळ	
१	अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे.	अध्यक्ष.
२	कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, ठाणे.	सदस्य.
३	सहाय्यक अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे.	सदस्य.
४	मुंबई परिमंडळातील अधीक्षक (नसल्यास प्रथम लिपिक).	सदस्य सचिव.
	कोल्हापूर परिमंडळ	
१	अधीक्षक अभियंता,सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ,सातारा.	अध्यक्ष.
२	कार्यकारी अभियंता, धोम पाटबंधारे विभाग, सातारा.	सदस्य.
३	सहाय्यक अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ,सातारा.	सदस्य.
४	कोल्हापूर परिमंडळातील अधीक्षक (नसल्यास प्रथम लिपिक).	सदस्य सचिव.

१) वरील प्रमाणे सर्व संबंधित अधीक्षक अभियंता तथा अध्यक्ष नागरी सेवा मंडळ (२) यांनी त्वरीत कार्यवाही करुन पूर्तता अहवाल शासनास सत्वर सादर करावा.

२) जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील गट ब -अराजपत्रित (कनिष्ठ अभियंता वगळून) आणि गट क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या परिमंडळाबाहेरील आणि परिमंडळांतर्गत पदस्थापना व बदल्या याबाबतचे सर्व (नियतकालिक व विशेषबाब सह) प्रस्ताव वरील नमूद नागरी सेवा मंडळ (२) यांना सादर करण्यात यावेत.

३) नागरी सेवा मंडळ (२) सदर सर्व प्रस्तावांची महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) अधिनियम २००६ मधील तरतूदी तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ११/०२/२०१५ च्या शासन परिपत्रकान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार काटेकोरपणे तपासणी करुन संबंधित परिमंडळीय अधिकारी यांना शिफारशी सादर करतील.

४) कर्मचाऱ्यांच्या परिमंडळांतर्गत नियतकालिक (विशेष बाब वगळता) बदल्या व पदस्थापनेच्या प्रस्तावासंदर्भात नागरी सेवा मंडळ (२) यांच्या शिफारशींच्या अनुषंगाने संबंधित परिमंडळीय अधिकारी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा.

५) कर्मचाऱ्यांच्या परिमंडळाबाहेरील सर्व आणि परिमंडळांतर्गत विशेष बाब बदल्यांच्या प्रस्तावासंदर्भात नागरी सेवा मंडळ (२) यांच्या शिफारशींच्या अनुषंगाने उचित प्रस्ताव संबंधित परिमंडळीय अधिकारी प्रस्ताव सचिव (लाक्षेवि) यांना सादर करावेत.

६) परिमंडळांतर्गत विशेष बाब बदल्यांच्या प्रस्तावासंदर्भात नागरी सेवा मंडळ (२) यांच्या शिफारशींच्या अनुषंगाने सचिव (लाक्षेवि) निर्णय घेतील.

७) सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ३१/०१/२०१४ च्या शासन निर्णयातील ३.६ नुसार गट ब (अराजपत्रित-कनिष्ठ अभियंता संवर्ग वगळून) आणि गट क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या परिमंडळाबाहेरील पदस्थापना व बदल्यांचे सर्व प्रस्ताव शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्र. नासेमं /(प्र. क्र. १८/ १४)/ आस्था (संनि), दि. २९/०८/२०१५ अन्वये स्थापन केलेल्या नागरी सेवा मंडळ (१)-अ यांना सादर करण्यात येतील व त्यावर सचिव (लाक्षेवि) हे निर्णय घेतील.

२. नागरी सेवा मंडळांची कार्यकक्षा खालील प्रमाणे राहील:-

नागरी सेवा मंडळाकडे प्रस्ताव सादर करताना त्यामध्ये खालील माहिती अंतर्भूत असावी:-

१) बदलीबाबतच्या प्रस्तावामध्ये खालील तपशील दर्शक माहिती व त्यांच्या पृष्ठयर्थ आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात यावीत-

अ. प्रस्तावित बदलीसाठी कर्मचाऱ्याची पात्रता.

ब. विशेष बदली असल्यास त्याबाबतची कारणे.

क. बदली प्रस्तावाचे समर्थन.

पदोन्नतीने पदस्थापनेबाबतच्या प्रस्तावामध्ये खालील तपशीलदर्शक माहिती व त्यांच्या पृष्ठयर्थ आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात यावीत-

अ. पदोन्नतीस पात्र केल्याचा तपशील.

ब. संवर्ग वाटपाची मान्यता.

क. विभागीय चौकशी किंवा गंभीर तक्रारींचा तपशील.

२) मंडळाने सदर प्रस्तावांची महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) अधिनियम २००६ मधील तरतूदी तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ११/०२/२०१५ च्या शासन परिपत्रकान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार काटेकोरपणे तपासणी करावी.

३) नागरी सेवा मंडळाने प्रस्तावाबाबत एकमताने शिफारशी कराव्यात. प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून सात दिवसात शिफारशी देणे बंधनकारक राहील.

४) काही अपरिहार्य कारणाने नागरी सेवा मंडळाच्या सदस्यांना एकत्रित बैठकीस विलंब होत असल्यास दूरध्वनीवरुन चर्चा करुन circulation पध्दतीने शिफारशी करता येतील.

५) नागरी सेवा मंडळाने प्रस्तावातील बदल्या/ नियुक्त्यांबाबत प्रचलित शासन नियमांतील (बदली अधिनियम कायदा, विभागीय संवर्ग बदल, समावेशन इ.) तरतूदींचे पालन होते किंवा कसे याबाबत अभिप्राय दयावेत. परिमंडळाने/ मंडळाने प्रस्तावित केलेल्या सविस्तर नियुक्त्यांबाबत अभिप्राय देऊ नयेत. उदा. ठराविक कर्मचाऱ्यास ठराविक ठिकाणी नियुक्ती.

६) कर्मचाऱ्यांच्या पदस्थापना व बदल्या याबाबत शिफारशी करताना परिमंडळबाह्य व परिमंडळांतर्गत तसेच मंडळांतर्गत रिक्त पदे त्यानुषंगाने कार्यालयीन कामकाजावर होणारा परिणाम याचा सर्वंकष आढावा घ्यावा.

७) सर्व बदल्या/ पदस्थापना (परिमंडळबाह्य/ परिमंडळांतर्गत/ अनियतकालिक/ नियतकालिक) प्रस्तावांची- बदलीसाठीचे कारण, दोन्ही कार्यालयातील रिक्त पदे याचा सर्वकष आढावा घेऊन नागरी सेवा मंडळ २ (अ) यांनी संबंधित परिमंडळीय अधिका-यांकडे शिफारशी कराव्यात.

८) परिमंडळबाहय बदल्यांबाबत शिफारशी करताना बिंदूनामावली बाधित होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१६०२०४१६५१०४५३२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mandar Karnik

Digitally signed by Mandar Karnik
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c9dc3627883491b86c340df143bdb41a0e374fe9fd79690dc98e4863450b5f45, cn=Mandar Karnik
Date: 2016.02.08 11:29:21 +05'30'

(मं. र. कर्णिक)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

२. सर्व सन्माननीय विधानसभा/ विधानपरिषद व संसद सदस्य,
३. मा. राज्यपालांचे सचिव,
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
५. मा. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ स्वीय सहायक,
६. मा. मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव,
७. मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव,
८. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,
९. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग,
१०.सर्व अधीक्षक अभियंता तथा परिमंडळीय अधिकारी, जलसंपदा विभाग,
११.सर्व संबंधित नागरी सेवा मंडळांचे अध्यक्ष, सदस्य व सदस्य सचिव, जलसंपदा विभाग,
१२.सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन १२, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१३.जलसंपदा विभागातील सर्व अधिकारी व सर्व कार्यासने,
१४.आस्था (अतांत्रिक) संग्रहार्थ.